Series : €ABA€ | SET-4

प्रश्न–पत्र कोड
Q.P. Code **9**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थींनी उत्तर–पुस्तिकेच्या मुख–पृष्ठावर प्रश्न–पत्र कोड अवश्य लिहावा.
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

- प्रश्न–पत्रिकेत **4** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न–पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला प्रश्न–पत्र कोड उत्तर–पुस्तिकेच्या मुख–पृष्ठावर लिहा.
- प्रश्न–पत्रिकेत 7 प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न–पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न–पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न–पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.

- Please check that this question paper contains **4** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **7** questions.
- **Please write down the Serial Number of the question in the answer-book before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

*

# मराठी
# MARATHI

*वेळ : **2** तास* | *गुण : **40***
*निर्धारित समय : **2** घंटे* | *अधिकतम अंक : **40***
*Time allowed : **2** hours* | *Maximum Marks : **40***

## विभाग – अ (आकलन)

1. पुढील परिच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

शिक्षण मानवी विकासाचा पर्यायाने राष्ट्रविकासाचा केंद्रबिंदू होय. शिक्षणाने संस्कृतीवर्धन होऊन राष्ट्र विकसित बनते. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून निरनिराळ्या शिक्षण तज्ज्ञांनी राष्ट्रीय शिक्षण देण्याचा प्रयोग सुरु केला होता. स्वभाषा, स्वलिपी, स्वदेशी वस्तू व राष्ट्राभिमान यांनी प्रेरित होऊन शाळा, महाविद्यालये व राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना होऊ लागली होती; पण ब्रिटिश शासनाच्या ध्येय धोरणामुळे फारशी प्रगती होऊ शकली नाही. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल झपाट्याने होत आहेत. शिक्षणाची उद्दिष्टे, अभ्यासक्रम, सार्वत्रिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, स्त्री शिक्षण, दुर्बल घटकांचे शिक्षण, निरंतर शिक्षण याचबरोबर मूल्यशिक्षण या क्षेत्रातही शैक्षणिक विचारांची भर पडत आहे. ज्ञानाचा प्रस्फोट व विज्ञानाचा मानवी जीवनात अधिकाअधिक वापर यामुळे जुन्या मूल्यांची जागा नवीन मूल्ये घेत आहेत. या पार्श्वभूमीवर–पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांचे विचार भूतकाळात जमा करुन त्याकडे डोळेझाक करणे जसे सूज्ञपणाचे नाही, त्याचप्रमाणे भारतीय विचारवंत, संत यांचे शिक्षणक्षेत्राला दिलेल्या विचारधनाकडे डोळेझाक करणे सूज्ञपणाचे ठरणार नाही.

भारतीय संस्कृती, परंपरा ही अतिशय उज्ज्वल व प्राचीन आहे. या संस्कृतीवर आजवर अनेक आघात झाले. ते संस्कृतीने पचविले, तर काही परतवून लावले. आजही भारतीय संस्कृती आपले स्थान विश्वामध्ये राखून आहे. कारण तिचे तत्व हे चिरंतन आहे. संत ज्ञानेश्वर, रामदास स्वामी, विवेकानंद, विनोबाजी इ.संत, महात्मे भारतीय पद्धतीनेच परमार्थाचा विचार करतात. परमेश्वराच्या ठिकाणी त्यांची पूर्ण श्रद्धा आहे; पण त्यांचा ईश्वर हिमालयात बसलेला नाही, तर अर्धपोटी राहणाऱ्या, अज्ञान, दारिद्र्य व अंधश्रद्धा यांच्या पाशात अगतिक झालेल्या दीन आणि दलित देशबांधवांत या संतांना त्यांचा देव दिसतो. समाजप्रबोधनाचे कार्य करताना सर्व संतांनी स्वार्थ हेतूला संक्षेप दिला आहे.

**प्रश्न :**

(1) आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्वकाळ ते आजपर्यंत शिक्षणाचा विकास कसा होत गेला ? **3**

(2) भारतीय संस्कृतीबद्दल कोणते विचार व्यक्त केले आहेत ? **2**

(3) भारतीय संत, महात्म्यांचा देवाविषयीचा दृष्टिकोन कोणता आहे ? **2**

* 

## विभाग – ब (लेखन)

2. पुढीलपैकी **एका** विषयावर अंदाजे 80/100 शब्दांत आपले मत किंवा विचार मांडा. **5**

(1) सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व.

(2) वृद्धाश्रमातील वृद्धाचे मनोगत.

(3) अविस्मरणीय सहल.

(4) काय ही महागाई !

3. पुढीलपैकी एका बातमी आधारे **एक** वृत्तलेख लिहा. (अंदाजे **50/60** शब्दांत) **5**

लोणावळा – खंडाळ्यात पर्यटकांची गर्दी; निर्बंधामुळे उत्साहावर विरजण.

**अथवा**

गानसम्राज्ञी लतादिदींना भावपूर्ण निरोप.

**विभाग – क (गद्य – पद्य पाठ)**

4. (अ) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा. (प्रत्येकी सुमारे **35/40** शब्दांत) **4**

(1) पहाटे खिडकीच्या काळोखात लेखकाचे मन काय शोधीत होते ?

(2) श्री. वसंत सबनीसांनी सहावे महाभूत कशास म्हटले आहे ? का ?

(3) श्री. यू.म. पठाणं यांनी आपल्या नातीबद्दलच्या कोणत्या भावना व्यक्त केल्या आहेत ?

(4) स्वत:चा दात दुखू लागल्यानंतर लेखकाच्यामनामध्ये स्वत:च्या दातांबद्दल कोणते विचार आले ?

(आ) पुढीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर सुमारे **70/75** शब्दांत लिहा. **3**

(1) इवल्या इवल्या पाखरांचे पहाटेशी असलेले नाते लेखकाने कसे वर्णन केले आहे ?

(2) परशा पहेलवानाचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(3) सकाळी झाडांना पाणी घालताना लेखकाला कोणता अनुभव येतो ?

5. (अ) कोणत्याही **एका** प्रश्नाचे सुमारे **35/40** शब्दांत उत्तर लिहा. **2**

(1) आरशातील स्त्रीला आजची स्त्री पाहून का दु:ख वाटते ?

(2) 'तमोगुणमागे सारां । सत्वगुणलावा अंगारा ।' या ओळींचा आशय स्पष्ट करा.

(3) आरशातील स्त्रीला आजची स्त्री पूर्वी कशी दिसत असे ?

(आ) पुढीलपैकी **एका** प्रश्नाचे उत्तर सुमारे **70/75** शब्दांत लिहा. **3**

(1) कामक्रोध विंचू चावलेल्या माणसाला कोणता अनुभव येतो ?

(2) 'किती बदललीस गं तू, अंतर्बाह्य ...... !' असे आरशातील स्त्री कोणाला व का म्हणते ?

(3) 'मनुष्य इंगळी अति दारूण । मज नांगा मारिला तिनें असे संत एकनाथांनी का म्हटले आहे ?

6. अहवालाची प्रमुख अंगे सांगून कोणत्याही एकाची सविस्तर माहिती लिहा. **3**

**किंवा**

वृत्तलेखाच्या कोणत्याही एका प्रकाराची माहिती लिहा.

**विभाग – ड (व्याकरण)**

7. सूचनांप्रमाणे उत्तरे लिहा. **2**

(1) (अधोरेखित शब्दाऐवजी योग्य समानार्थी वापरा.)

(अ) गावात नवीन आलेल्या माणसाची पाटलांनी <u>वास्तपुस्त</u> केली.

(ब) लहानपणी आजीने आमच्यावर मायेची <u>पाखर</u> घातली.

(2) पुढे काही वाक्ये दिली आहेत. त्या वाक्यांत कंसात दिलेल्या वाक्प्रचारांपैकी योग्य त्या वाक्प्रचाराचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा. **2**

(फितूर होणे, पारखे होणे, बुलंद, असोशी)

(अ) राजाच्या काही सैनिकांनी दगाबाजी केल्यामुळे राजाचा पराभव झाला.

(ब) व्यसनाधीनतेमुळे शामला सुख मिळाले नाही.

(3) श्वेताने छान भाजी केली. (प्रयोग ओळखा) **2**

**किंवा**

मुली सुंदर गाणी गातात. (कर्मणी प्रयोग करा.)

(4) मुलें चोर पकडतात. (भावे प्रयोग करा.) **2**

**किंवा**

ज्ञानदाने साडी खरेदी केली. (कर्तरी प्रयोग करा.)

*